गुरुवार दि. ०२ जुलै २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३०१ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जगन्नाथा हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### विधानसभेत आ. बबनराव लोणीकरांचा गंभीर गौप्यस्फोट

# परवानगी ७८ हजार ब्रासची, उत्खनन १० लाख ब्रास

## महसूल, पर्यावरण आणि सार्वजनिक सुरक्षेशी खेळ झाल्याचा दावा, उच्चस्तरीय चौकशीची मागणी

**मुंबई - प्रतिनिधी**

समृद्धी महामार्गाच्या कामासाठी जालना जिल्ह्यात झालेल्या कथित अवैध मुरूम उत्खननाचा मुद्दा राज्याच्या पावसाळी अधिवेशनात गाजला. भाजपचे आमदार बबनराव लोणीकर यांनी विधानसभेत औचित्याचा मुद्दा उपस्थित करत शासनाच्या गौण खनिज व्यवस्थापनावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. शासनाने केवळ ७८ हजार ८१५ ब्रास मुरूम उत्खननास परवानगी दिली असताना प्रत्यक्षात १० लाख ब्रासांहून अधिक मुरूमाचे उत्खनन झाल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. या कथित प्रकारामुळे शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या महसुलाची हानी झाल्याचा दावा करत संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र आणि उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी सभागृहात केली.
आमदार लोणीकर यांनी सांगितले की, उत्खननासाठी देण्यात आलेल्या परवानगीची मुदत १८ मे २०२६ रोजी संपुष्टात आली होती. मात्र, त्यानंतरही जालना जिल्ह्यात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात मुरूम उत्खनन सुरूच राहिल्याचा आरोप त्यांनी केला. मंठा तालुक्यातील पाटोदा खुर्द, हेलसवाडी, पाकणी, आकणी, कानफोडी, हेलस, वाई आणि हातवण तसेच परतूर तालुक्यातील भोंगाने, दहिफळ, वाटूर, पिंपरखेडा गरड आणि जालना तालुक्यातील सारवाडीसह अनेक गावांमध्ये मंजूर मर्यादेपेक्षा अनेक पटीने उत्खनन झाल्याचा दावा त्यांनी केला.
त्यांच्या मते, महसूल विभागाच्या मोजणी अधिकाऱ्यांवर दबाव आणण्याचा प्रयत्न झाला असला तरी त्यांच्या अहवालातही मंजूर क्षमतेपेक्षा चार ते पाच पट अधिक उत्खनन झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे प्रत्यक्षात झालेल्या कथित अवैध उत्खननाचे प्रमाण याहून अधिक असण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे त्यांनी सांगितले.
आमदार लोणीकर यांनी जालना जिल्हाधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी तसेच लघु पाटबंधारे विभागातील संबंधित अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप करत म्हटले की, उत्खनन क्षेत्राचे मार्किंग करणे, नियमित पाहणी करणे, मंजूर मर्यादेपेक्षा अधिक उत्खनन रोखणे, नियमभंग झाल्यास पोलिसांत गुन्हे दाखल करणे आणि वरिष्ठांना अहवाल सादर करणे ही संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी होती. मात्र लाखो ब्रास मुरूमाचे कथित अवैध उत्खनन सुरू असतानाही प्रशासनाने कोणतीही प्रभावी कारवाई केली नाही. उलट कारवाई करणाऱ्या किंवा मोजणी करणाऱ्या अधिकाऱ्यांवर दबाव आणण्यात आल्याचाही आरोप त्यांनी केला.
लोणीकर यांनी मंठा तालुक्यातील नागतास साठवण तलावाच्या सिमेंट काँक्रीटच्या सांडव्याचे जेसीबीच्या साहाय्याने नुकसान करण्यात आल्याचा आरोप केला. या प्रकरणी मंठा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असल्याचा उल्लेख त्यांनी केला. तलावाच्या भिंतीलगत मोठ्या प्रमाणावर खोदकाम झाल्याने भिंत कोसळण्याचा धोका निर्माण झाला असून त्यामुळे शेती, जनावरे आणि संपूर्ण गावाच्या सुरक्षिततेवर गंभीर परिणाम होऊ शकतो, असा इशाराही त्यांनी दिला.
समृद्धी महामार्गाच्या बांधकामात वापरण्यात आलेल्या साहित्याच्या गुणवत्तेवरही आमदार लोणीकर यांनी प्रश्न उपस्थित केले. दर्जेदार मुरूमाऐवजी दगड, गोटे आणि काळी माती वापरण्यात आल्यामुळे भविष्यात रस्त्याच्या टिकाऊपणावर परिणाम होऊ शकतो, असा आरोप त्यांनी केला.
तसेच जालनानांदेड समृद्धी महामार्गासाठी जमीन संपादित करताना शेतकऱ्यांना प्रतिएकर केवळ १३ ते १८ लाख रुपये मोबदला देण्यात आला. नागपूरमुंबई समृद्धी महामार्गाप्रमाणे न्याय्य भरपाई मिळाली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी असल्याचेही त्यांनी सभागृहात नमूद केले.
या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, जालना जिल्हाधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी आणि संबंधित अभियंत्यांना तात्काळ निलंबित करावे, त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करून मालमत्ता जप्त करावी आणि शासनाच्या महसुलाचे झालेले नुकसान संबंधितांकडून वैयक्तिकरित्या वसूल करावे, अशी मागणी आमदार लोणीकर यांनी केली.
याशिवाय संबंधित कंत्राटदारावर ५१ टक्के दंड आकारून कठोर कारवाई करावी तसेच पर्यावरण नियमांचे उल्लंघन आणि गौण खनिजाच्या कथित अवैध उत्खननात सहभागी असलेल्या प्रत्येकावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणीही त्यांनी केली.
दरम्यान, आमदार लोणीकर यांनी विधानसभेत केलेल्या या गंभीर आरोपांमुळे समृद्धी महामार्गाशी संबंधित कथित मुरूम उत्खननाचा मुद्दा राज्याच्या राजकीय व प्रशासकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरला आहे. या आरोपांवर शासन आणि संबंधित प्रशासनाकडून काय भूमिका घेतली जाते, तसेच चौकशीचे आदेश दिले जातात का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### हायकोर्टपेक्षा जिल्हाधिकारी मोठे आहेत का?

**सभागृहात बोलताना आमदार लोणीकर यांनी पर्यावरणीय नियमांच्या कथित उल्लंघनाचाही मुद्दा उपस्थित केला. उच्च न्यायालयाचे निर्देश आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांनुसार संध्याकाळी ६ नंतर गौण खनिज उत्खननास परवानगी नसताना, जालना जिल्हाधिकाऱ्यांनी रात्री उत्खनन करण्यासंदर्भात लेखी आदेश कसे दिले, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. ''जालना जिल्हाधिकारी हे उच्च न्यायालय किंवा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रादेशिक संचालकांपेक्षा मोठे आहेत का?''**



**असा थेट प्रश्न उपस्थित करत त्यांनी या आदेशांची वैधता तपासण्याची मागणी केली.**

# परतूर येथे ५ जुलैला मोफत कॅन्सर स्क्रीनिंग आणि दंत तपासणी शिबिर

## अग्र युनिक ग्रुप जालना, परतूर डॉक्टर असोसिएशन व लॉयन्स क्लबचा संयुक्त उपक्रम

**जालना - प्रतिनिधी**

अग्र युनिक ग्रुप जालना, परतूर डॉक्टर असोसिएशन व लॉयन्स क्लब ऑफ परतूर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. ५ जुलै रोजी परतुर येथे मोफत कॅन्सर स्क्रीनिंग व दंत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.
कॅन्सरचे लवकर परीक्षण केल्याने जीवन वाचू शकतो हा संदेश घेऊन जालना आणि परतूर येथील विविध नामांकित संस्थांच्यावतीने परतूर येथील डॉ. संदीप चव्हाण यांच्या कृष्णा हॉस्पीटलमध्ये सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत आयोजित या शिबिरात छत्रपती संभाजीनगर येथील एशियन हॉस्पिटलचे कॅन्सर तज्ज्ञ डॉ.



आकाश मोर आणि जालना येथील दंत शल्यचिकित्सक डॉ. दिया जे. डेमडा ह्या रुग्णांची मोफत तपासणी करून सल्ला देणार आहेत. शिबिरात मॅमोग्राफी, पॅप स्मिअर, यु.एस.जी. ॲब्डोमेन, डेंटल चेक-अप, टी.एम.जे. जॉइंट चेक-अप, ओरल कॅन्सर व बायोप्सी या चाचण्या करण्यात येणार आहेत. ३० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वयाचे स्त्री व पुरुष, ज्यांच्या परिवारामध्ये पूर्वी कोणास कॅन्सर आजार झालेला असेल, किंवा ज्यांना कॅन्सरपासून बचावासाठी माहिती हवी आहे, अशांनी या शिबिराचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा आणि अधिक माहितीसह नाव नोंदणीसाठी कृष्णा हॉस्पिटलच्या मोबाईल क्रमांक ९३०७५१५१९६, ७०५७२५९७०९ वर संपर्क साधावा, असे आवाहन अग्र युनिक ग्रुप जालनाच्या संस्थापक अध्यक्ष जयश्री अग्रवाल, पूनम अग्रवाल, प्रकल्प प्रमुख सपना अग्रवाल, सविता बगडिया, परतूर डॉक्टर्स *(पान २ वर)*

### जालन्यात झोपडपट्टीधारकांच्या पीआर कार्ड प्रक्रियेला वेग; १४ झोपडपट्ट्यांमधील घरांचा सर्वेक्षण अंतिम टप्प्यात

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील झोपडपट्टीधारकांना मालकी हक्काच्या दिशेने महत्त्वाचा टप्पा मानल्या जाणाऱ्या पीआर कार्ड प्रक्रियेला वेग आला असून, या संस्थेमार्फत शहरातील १४ झोपडपट्ट्यांमध्ये व्यापक सर्वेक्षण सुरू आहे. या सर्वेक्षणाअंतर्गत सुमारे ६६ हेक्टर क्षेत्रातील ६,७४३ घरांची नोंदणी व पडताळणी केली जात असून, रहिवाशांकडून आवश्यक कागदपत्रे संकलित करण्याचे काम अंतिम टप्प्यात पोहोचले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आतापर्यंत १४ पैकी ११ झोपडपट्ट्यांमध्ये प्रत्यक्ष सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. संबंधित झोपडपट्टीधारकांकडून वास्तव्याचे पुरावे, महानगरपालिकेच्या मालमत्ता कराच्या पावत्या, ओळखपत्रे तसेच शासनाने आवश्यक ठरविलेली इतर कागदपत्रे स्वीकारून त्यांचे डिजिटल नोंदणीकरण (ऑनलाइन अपलोड) करण्यात येत आहे.

**कागदपत्र संकलन आणि ऑनलाइन प्रक्रिया सुरू**

च्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, आतापर्यंत सुमारे एक हजार नागरिकांची कागदपत्रे जमा करून ती ऑनलाइन प्रणालीमध्ये अपलोड करण्यात आली आहेत. प्राथमिक पडताळणीनंतर त्यापैकी अंदाजे ४०० ते ४५० झोपडपट्टीधारक पीआर कार्डसाठी पात्र ठरत असल्याचे समोर आले आहे.
मात्र, हा आकडा पुढील पडताळणी आणि उर्वरित कागदपत्रांच्या तपासणीनंतर वाढण्याची शक्यता असल्याचेही सांगितले जात आहे.

**अनेक**

# आजपासून वारकऱ्यांच्या चरण सेवेला प्रारंभ भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची!

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा उपक्रम

**मुंबई - प्रतिनिधी**

: दि.१:आषाढी वारीदरम्यान पंढरपूरकडे पायी जाणाऱ्या लाखो वारकऱ्यांना मोफत आरोग्यसेवा आणि चरणसेवेचा लाभ मिळावा, यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातर्फे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील चरणसेवा उपक्रम यंदाही राबविण्यात येत आहे.
राज्यातील ११ जिल्ह्यांतील पालखी मार्गावरील सुमारे ४०० मुक्कामस्थळी हा उपक्रम राबविण्यात येणार असून, १२ हजारांहून अधिक डॉक्टर, फिजिओथेरपिस्ट, परिचारिका, पॅरामेडिकल कर्मचारी, वैद्यकीय विद्यार्थी आणि स्वयंसेवक वारकऱ्यांच्या सेवेसाठी सज्ज राहणार आहेत.
वारकऱ्यांच्या पायांवरील ताण कमी करण्यासाठी सुमारे ३ हजार लिटर औषधी आयुर्वेदिक तेलाद्वारे पायांची मालिश, फिजिओथेरपी, प्राथमिक उपचार, वैद्यकीय तपासणी तसेच आवश्यकतेनुसार पुढील उपचारासाठी संबंधित रुग्णालयात संदर्भित करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच गरजेनुसार रुग्णवाहिका सेवाही सज्ज ठेवण्यात आली आहे.
याशिवाय, पालखी मार्गावर ८ आरोग्य जनजागृती रथांच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती, स्वच्छतेचे महत्त्व, संसर्गजन्य व पावसाळ्यातील आजारांपासून बचाव, निरोगी जीवनशैली आणि प्रतिबंधात्मक आरोग्यविषयक मार्गदर्शन वारकरी व नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. निवडक ठिकाणी योगसत्रांचेही आयोजन करण्यात आले आहे.
कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले की, गतवर्षी चरणसेवा उपक्रमाला वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमातून १ लाख ७५ हजारांहून अधिक वारकऱ्यांना थेट चरणसेवा, वैद्यकीय तपासणी आणि उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात *(पान २ वर)*






### उपतालुकाप्रमुख अर्जुन पाटील -ठोंबरे यांच्या संघर्षाला यश

# स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच जाफराबाद - छत्रपती संभाजीनगर एसटी सुरु

## जवखेडा ठोंबरे नगरीत येथे चालक-वाहकांचा जाहीर सत्कार

**भोकरदन - प्रतिनिधी**

ग्रामीण भागाच्या विकासासाठी आणि जनतेच्या मूलभूत वाहतूक सुविधेसाठी केलेल्या सातत्यपूर्ण संघर्षाला अखेर यश मिळाले आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)पक्षाचे भोकरदन उपतालुकाप्रमुख
अर्जुन पाटील-ठोंबरे यांच्या अथक पाठपुराव्यामुळे स्वातंत्र्यानंतर
प्रथमच जाफराबादछत्रपती संभाजीनगर दरम्यान माहोरा बरंजळा साबळेनळणी जवखेडा ठोंबरे केदारखेडा राजूर दाभाडी तळेगाव फुलंब्री या मार्गे
नियमित एसटी बससेवा सुरू झाली आहे. अनेक दशकांपासून सार्वजनिक बससेवेपासून वंचित असलेल्या या परिसरासाठी हा ऐतिहासिक आणि अभिमानास्पद क्षण मानला जात आहे. माहोरा, वरूड, पिंपळगाव कड, बरंजळा साबळे, नळणी, जवखेडा ठोंबरे,



केदारखेडा, राजूर,दाभाडी- तळेगाव, फुलंब्री तसेच परिसरातील हजारो नागरिक अनेक वर्षांपासून या बससेवेची प्रतीक्षा करत होते. शिक्षण, आरोग्य, रोजगार, शासकीय कामकाज, व्यापार आणि दैनंदिन प्रवासासाठी नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. विशेषतः विद्यार्थी, महिला,ज्येष्ठ नागरिक, शेतकरी, कामगार आणि रुग्णांना या समस्येचा सर्वाधिक फटका बसत होता. या प्रश्नाची तीव्रता ओळखून अर्जुन पाटील ठोंबरे यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या विभागीय कार्यालयापासून ते मुंबई येथील मध्यवर्ती कार्यालयापर्यंत सातत्याने पाठपुरावा केला. अनेक निवेदने, स्मरणपत्रे, अधिकाऱ्यांच्या भेटी,लोकप्रतिनिधींचे सहकार्य, ग्रामसभांचे एकमताने मंजूर ठराव, रस्ता पाहणीची मागणी,पुनर्पाहणी,अंतिम रस्ता सर्वेक्षण, सकारात्मक रस्ता पाहणी अहवाल,विभागीय प्रस्ताव आणि वरिष्ठ पातळीवरील पाठपुरावा अशा सर्व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करूनही बससेवा सुरू होत नसल्याने त्यांनी हा प्रश्न सातत्याने लावून धरला. आवश्यक असल्यास लोकशाही मार्गाने जनआंदोलन तसेच न्यायालयीन लढ्याचा इशाराही देण्यात आला होता. अखेर प्रशासनाने
सकारात्मक निर्णय घेत ही बहुप्रतिक्षित बससेवा सुरू केली. या बससेवेमुळे ग्रामीण भाग थेट झपाट्याने विकसित होत असलेल्या छत्रपती संभाजीनगर शहराशी जोडला गेला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना *(पान २ वर)*

# संपादकीय....

## बालगुन्हेगारीला आळा कसा?; कायदा, संस्कार आणि पुनर्वसनाची त्रिसूत्रीच प्रभावी

राज्यात वाढत्या बालगुन्हेगारीचा मुद्दा पुन्हा एकदा विधानसभेत चर्चेच्या केंद्रस्थानी आला. आमदार अर्जुनराव खोतकर यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीद्वारे अल्पवयीन मुलांचा गुन्हेगारीसाठी होत असलेला वापर आणि त्यामागील संघटित टोळ्यांचे जाळे याकडे शासनाचे लक्ष वेधले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कायद्यात आवश्यक दुरुस्ती करून अशा टोळ्यांवर अधिक कठोर कारवाई करण्याची भूमिका जाहीर केली. हा निर्णय स्वागतार्ह असला तरी बालगुन्हेगारीसारख्या गुंतागुंतीच्या प्रश्नाकडे केवळ कायदा आणि शिक्षेच्या चौकटीत पाहून चालणार नाही.

आजची वस्तुस्थिती चिंताजनक आहे. अनेक शहरांमध्ये आणि ग्रामीण भागातही अल्पवयीन मुलांच्या हातात चाकू, कोयते, तलवारी किंवा इतर घातक शस्त्रे दिसत आहेत. किरकोळ वादांपासून ते गंभीर गुन्ह्यांपर्यंत अल्पवयीन मुलांचा सहभाग वाढत असल्याची उदाहरणे समोर येत आहेत. यामागे केवळ मुलांचा दोष नसून त्यांना गुन्हेगारीकडे वळवणारी संपूर्ण सामाजिक परिस्थिती जबाबदार आहे.

काही सराईत गुन्हेगार आणि संघटित टोळ्या अल्पवयीन मुलांचा वापर ''कायद्याचा फायदा'' म्हणून करतात, ही वस्तुस्थिती आता लपून राहिलेली नाही. अल्पवयीन असल्यामुळे शिक्षा तुलनेने कमी होईल किंवा कायदेशीर प्रक्रिया वेगळी असेल, या मानसिकतेतून मुलांना पैशांचे आमिष, नशेचे व्यसन किंवा इतर प्रलोभने देऊन गुन्ह्यांमध्ये ढकलले जाते. त्यामुळे अशा टोळ्यांवर कठोर कारवाई करण्याची गरज निश्चितच आहे. जर आवश्यक असेल, तर कायद्यात दुरुस्ती करून अशा गुन्हेगारांना अधिक कठोर शिक्षा देण्याचा विचार योग्य ठरू शकतो.

मात्र, प्रत्येक बालगुन्हेगार जन्मतः गुन्हेगार नसतो. अनेकदा कौटुंबिक अस्थिरता, शिक्षणापासून दुरावा, व्यसनाधीन वातावरण, बेरोजगारी, सोशल मीडियाचा अतिरेक, हिंसक सामग्रीचा प्रभाव, चुकीची मित्रमंडळी आणि समाजातील वाढती असंवेदनशीलता यामुळे मुले गुन्हेगारीकडे वळतात. त्यामुळे केवळ कठोर शिक्षा हा उपाय असू शकत नाही.

शाळा, पालक आणि समाज या तिन्ही घटकांनी मुलांच्या मानसिक आरोग्याकडे अधिक लक्ष देणे आवश्यक आहे. मुलांमध्ये संवादाचा अभाव वाढत चालला आहे. मोबाईल आणि डिजिटल माध्यमांनी त्यांचे जग बदलले आहे; मात्र योग्य दिशा देणारे संस्कार आणि मार्गदर्शन अनेक ठिकाणी कमी पडत आहे. शाळांमध्ये समुपदेशन, जीवनकौशल्य शिक्षण, क्रीडा आणि सांस्कृतिक उपक्रम यांना अधिक महत्त्व दिल्यास अनेक मुले चुकीच्या मार्गावर जाण्यापासून रोखता येऊ शकतात.

पोलीस यंत्रणेची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. बालगुन्हेगारी घडल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा गुन्हे होण्यापूर्वी प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर देणे अधिक परिणामकारक ठरेल. शाळा, पोलीस, समाजकल्याण विभाग, महिला व बालविकास विभाग आणि स्वयंसेवी संस्थांमध्ये समन्वय निर्माण करून संवेदनशील परिसरांमध्ये विशेष मोहिमा राबविण्याची आवश्यकता आहे.

याचबरोबर, गुन्ह्यात अडकलेल्या अल्पवयीन मुलांचे पुनर्वसन ही शासनाची तितकीच मोठी जबाबदारी आहे. सुधारगृह हे केवळ शिक्षा भोगण्याचे ठिकाण न राहता शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण, मानसिक उपचार आणि समाजात पुनर्स्थापना घडवून आणणारे केंद्र बनले पाहिजे. अन्यथा सुधारगृहातून बाहेर पडलेली मुले पुन्हा गुन्हेगारीच्या चक्रात अडकण्याची शक्यता कायम राहते.

सरकारने कायद्यात सुधारणा करण्याचा संकेत दिला आहे, ही सकारात्मक बाब आहे. मात्र त्या सुधारणांसोबत प्रतिबंध, समुपदेशन, पुनर्वसन, शिक्षण, पालक जनजागृती आणि संघटित गुन्हेगारीवर कठोर कारवाई या सर्व बाबींचा समावेश असलेले सर्वंकष धोरण राबविणे तितकेच आवश्यक आहे.

कारण बालगुन्हेगारी हा केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न नाही; तो समाजाच्या भवितव्याचा प्रश्न आहे. मुलांच्या हातात शस्त्रे नव्हे, तर पुस्तके, कौशल्ये आणि उज्ज्वल भविष्य देण्याची जबाबदारी शासनाइतकीच समाजाचीही आहे.

दैनिक युवा आदर्श दि. ०२-०७-२०२६

CHANGE IN NAME

I HAVE CHANGE MY NAME FROM
My Old Name
BHAKKAD SANJANA SUNILKUMAR
To New Name
SANJANA SUNIL BHAKKAD
For Passport Issuence
Add- SR. NO. 100, MAHESH NAGAR,
JALNA DIST. JALNA 431203.



सिल्लोड शहराचे ज्येष्ठ नगरसेवक तथा विकास व नियोजन समितीचे सभापती शेख बाबू शेख भिकन यांचा बुधवारी वाढदिवस निमित्ताने त्यांचे सत्कार करताना लोकनियुक्त नगराध्यक्ष अब्दुल समीर सेठ, विठ्ठल सपकाळ , राजश्रीनिकमताई, वृत्तपत्रे विक्रेता शेख अफसर दिस्त आहे.

*छायाचित्र.शेख अफसर सिल्लोड*

# ग्रामपंचायत संगणक परिचालकांचा वनवास कधी संपणार?

## विधानसभेत आमदार बबनराव लोणीकर यांचा सरकारला सवाल;

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील ग्रामपंचायत संगणक परिचालकांच्या कर्मचारी दर्जा, किमान वेतन, नियमित मानधन, नोकरीची हमी आणि सामाजिक सुरक्षा या दीर्घकाळ प्रलंबित प्रश्नांचा मुद्दा विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात पुन्हा एकदा ऐरणीवर आला. भाजपचे आमदार बबनराव लोणीकर यांनी तारांकित प्रश्न क्रमांक ३६१८२ द्वारे ग्रामविकास विभागाला धारेवर धरत, ''प्रभू श्रीरामांचा वनवास १४ वर्षांत संपला; पण ग्रामपंचायत संगणक परिचालकांचा १४ वर्षांचा वनवास कधी संपणार?'' असा सवाल सरकारला केला.

राज्यातील सुमारे २८ हजार ५०० ग्रामपंचायतींमध्ये जवळपास २० हजार संगणक परिचालक गेली १४ वर्षे विविध डिजिटल सेवा सातत्याने देत आहेत. ग्रामपंचायतींच्या डिजिटल प्रशासनाचा कणा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या कर्मचाऱ्यांना आजही शासकीय कर्मचारी म्हणून मान्यता मिळालेली नसल्याचा मुद्दा लोणीकर यांनी सभागृहात उपस्थित केला. शासनाच्या महत्त्वाकांक्षी डिजिटल उपक्रमांची अंमलबजावणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांनाच मूलभूत हक्कांपासून वंचित ठेवणे ही गंभीर बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. डिजिटल ग्रामपंचायतींचे संपूर्ण काम संगणक परिचालकांच्या खांद्यावर ग्रामपंचायतीमधील ई-ग्रामस्वराज, जन्म-मृत्यू नोंदणी, मालमत्ता कर वसुली, विविध दाखल्यांचे वितरण, ग्रामसभा नोंदी, शासनाच्या ऑनलाइन योजना, पंचायत राज व्यवस्थेतील डिजिटल कामकाज, विविध पोर्टलवरील माहिती अद्ययावत ठेवणे, नागरिकांना ऑनलाइन सेवा उपलब्ध करून देणे अशा असंख्य जबाबदाऱ्या संगणक परिचालक पार पाडत आहेत. ग्रामीण भागातील नागरिकांना शासनाच्या डिजिटल सेवांशी जोडण्यात त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका असूनही त्यांना आजही अत्यल्प मानधनावर काम करावे लागत असल्याचे लोणीकर यांनी सांगितले.

दहा हजार रुपयांत संसार कसा चालवायचा?

सध्या अनेक संगणक परिचालकांना केवळ रु. १० हजार मानधन मिळते.

पान १ वरुन...

### परतूर येथे ५...

असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. प्रदिप सातोनकर, सचिव डॉ. संदीप चव्हाण, कोषाध्यक्ष डॉ. दत्तात्रय नंद, लॉयन्सच्या झोन चेअरपर्सन रेवती राखे, लॉयन्स क्लब ऑफ परतूरचे अध्यक्ष महेश होलाणी, सचिव कैलास तांगडे, कोषाध्यक्ष नरपत जांगीड, प्रकल्प प्रमुख मनोहर खालापुरे यांनी केले आहे.

### जालन्यात झोपडपट्टीधारकांच्या...

**पात्र नागरिक अजूनही प्रतीक्षेत**

सर्वेक्षण आणि कागदपत्र संकलन सुरू असले तरी, महानगरपालिका प्रशासनाच्या दिरंगाईमुळे तसेच काही तांत्रिक प्रक्रियांतील अडचणींमुळे अनेक पात्र झोपडपट्टीधारकांना अद्याप पीआर कार्ड मिळू शकलेले नाही. त्यामुळे अनेक कुटुंबांमध्ये नाराजीचे वातावरण असून, प्रक्रिया अधिक वेगाने पूर्ण करण्याची मागणी होत आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, अनेक वर्षांपासून वास्तव्यास असतानाही केवळ प्रशासकीय विलंबामुळे त्यांना मालकी हक्काचे अधिकृत प्रमाणपत्र मिळालेले नाही. परिणामी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यातही अडचणी निर्माण होत आहेत.

जिल्हाधिकाऱ्यांची बैठक; प्रक्रियेला गती देण्याच्या सूचना

या संपूर्ण प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर दोन दिवसांपूर्वी जिल्हाधिकारी जालना यांनी संबंधित विभागांची आढावा बैठक घेतली. या बैठकीत सर्वेक्षण, कागदपत्र पडताळणी आणि पीआर कार्ड वितरणाची प्रक्रिया अधिक गतीने व पारदर्शकपणे पूर्ण करण्याबाबत आवश्यक सूचना देण्यात आल्याची माहिती मिळाली आहे.

प्रशासनाने पात्र लाभार्थ्यांना अनावश्यक विलंब न लावता न्याय मिळावा, यासाठी आवश्यक समन्वय ठेवण्याच्या सूचनाही बैठकीत देण्यात आल्याचे समजते.

मनपा प्रशासनाची भूमिका महत्त्वाची

सध्या सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे, ज्यांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे आणि जे पात्र ठरले आहेत त्यांना टप्प्याटप्प्याने पीआर कार्ड वितरित केले जाणार का? की सर्व १४ झोपडपट्ट्यांतील सर्व कागदपत्रे संकलित व पडताळणी पूर्ण झाल्यानंतरच एकत्रितपणे वितरण केले जाणार?

याबाबत महानगरपालिका प्रशासनाने अद्याप स्पष्ट भूमिका जाहीर केलेली नसल्याने हजारो झोपडपट्टीधारकांमध्ये उत्सुकता आहे.

हजारो कुटुंबांच्या भवितव्याशी संबंधित प्रक्रिया

जालना शहरातील झोपडपट्टीधारकांसाठी पीआर कार्ड ही केवळ एक प्रशासकीय प्रक्रिया नसून त्यांच्या मालकी हक्काची अधिकृत नोंद, आर्थिक सुरक्षितता आणि भविष्यातील विकास योजनांचा पाया मानली जाते. त्यामुळे सर्वेक्षणानंतर पात्र लाभार्थ्यांना लवकरात लवकर पीआर कार्ड मिळावेत, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. आता महानगरपालिका प्रशासन जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनांनुसार पात्र लाभार्थ्यांना तत्काळ पीआर कार्ड देण्याचा निर्णय घेते की सर्व प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत प्रतीक्षा करण्याची भूमिका स्वीकारते, याकडे जालना शहरातील हजारो झोपडपट्टीधारकांचे लक्ष लागले आहे.

### आजपासून वारकऱ्यांच्या...

आल्या, तर १० लाखांपेक्षा अधिक नागरिकांपर्यंत आरोग्य जनजागृतीचा संदेश पोहोचविण्यात आला.

यंदा ११ जिल्ह्यांतील सुमारे ४०० सेवा केंद्रांवर १२ हजारांहून अधिक डॉक्टर, फिजिओथेरपिस्ट, परिचारिका, पॅरामेडिकल कर्मचारी, वैद्यकीय विद्यार्थी आणि स्वयंसेवक कार्यरत असून, ३ हजार लिटर औषधी आयुर्वेदिक तेल, रुग्णवाहिका सेवा आणि ८ आरोग्य जनजागृती रथांच्या माध्यमातून अधिक व्यापक स्वरूपात सेवा देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. अधिकाधिक वारकऱ्यांपर्यंत दर्जेदार आरोग्यसेवा पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे.

भक्ती विठोबाची... सेवा आरोग्याची या संकल्पनेवर आधारित चरणसेवा उपक्रमातून वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाला आधुनिक वैद्यकीय सेवेची जोड देण्यात आली असून, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने सर्व वारकरी, दिंडी प्रमुख आणि पालखी मार्गावरील नागरिकांना या उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

### स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच...

शिक्षणासाठी, रुग्णांना उपचारासाठी,शेतकऱ्यांना बाजारपेठेसाठी, नोकरदारांना रोजगारासाठी तसेच सर्वसामान्य नागरिकांना दैनंदिन प्रवासासाठी मोठा दिलासा मिळणार आहे. ही बससेवा केवळ वाहतुकीची सुविधा नसून संपूर्ण परिसराच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासाला चालना देणारा महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. बससेवा सुरू झाल्यानंतर जवखेडा ठोंबरे येथे चालक श्री एस. एस. हिवाळे व वाहक श्री सतीश बदर यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन जाहीर सत्कार करण्यात आला. या ऐतिहासिक प्रसंगी

गावकऱ्यांनी जल्लोष करत बसचे स्वागत केले. या कार्यक्रमास सरपंच लक्ष्मण ठोंबरे,श्रीनिवास काबरा,शेषराव ठोंबरे,विलास मेथे, परमेश्वर ठोंबरे, ॲड. ललित ठोंबरे,बालाप्रसाद ठोंबरे, साहेबराव ठोंबरे, भीमराव घोडे, रावसाहेब डकले, राजू ठोंबरे, गणेश ठोंबरे, तुषार चौधरी, महेश कोलते, ज्ञानेश्वर ठोंबरे, बाबुराव ठोंबरे, अण्णा ठोंबरे, मोहन वाघ, नामदेव काळे, नंदू मोरे, रमेश मोरे, सादिक पठाण, शिवाजी साठे यांच्यासह गावातील सर्व नागरिक, युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित नागरिकांनी बससेवा नियमित सुरू ठेवण्याची अपेक्षा व्यक्त केली. अनेकांनी हा दिवस परिसराच्या इतिहासातील सुवर्णक्षण असल्याचे सांगत आनंद व्यक्त केला. याबाबत प्रतिक्रिया देताना अर्जुन पाटील ठोंबरे म्हणाले, ही केवळ एसटी बस सुरू झाल्याची घटना नाही, तर अनेक वर्षांपासून वाहतुकीच्या मूलभूत सुविधेपासून वंचित असलेल्या ग्रामीण जनतेच्या संघर्षाचा विजय आहे. स्वातंत्र्यानंतर प्रथमच आपल्या भागाला जाफराबाद मार्गे छत्रपती संभाजीनगरची थेट एसटी सेवा मिळाली आहे. ही बससेवा आपल्या गावांच्या विकासाला, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला, युवकांच्या रोजगाराला, शेतकऱ्यांच्या प्रगतीला, रुग्णांच्या आरोग्यसेवेला आणि संपूर्ण परिसराच्या उज्ज्वल भविष्यासाठी मिळालेली नवी दिशा आहे. या लढ्यात साथ देणाऱ्या सर्व ग्रामस्थांचे, ग्रामपंचायतींचे, लोकप्रतिनिधींचे, प्रसारमाध्यमांचे आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. जनतेच्या प्रत्येक प्रश्नासाठी माझा संघर्ष भविष्यातही असाच अविरत सुरू राहील, असे ठोंबरे म्हणाले.

### एससी उपवर्गीकरणा विरोधात...

आंबेडकर आणि आनंदराज आंबेडकर यांनी अनुसूचित जातींमधील उपवर्गीकरणाचा प्रस्ताव सामाजिक न्याय, समता आणि भारतीय राज्यघटनेच्या मूलभूत तत्त्वांना बाधा पोहोचविणारा असल्याचा आरोप केला. समाजात कृत्रिम भेद निर्माण करून आरक्षणाच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासण्याचा प्रयत्न होत असल्याचे त्यांनी सांगितले. अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या मूळ स्वरूपाला कोणताही धक्का सहन केला जाणार नाही, असा इशाराही त्यांनी शासनाला दिला.

या विराट मोर्चामध्ये भारतीय बौद्ध महासभा, बौद्धजन पंचायत समिती, समता सैनिक दल तसेच विविध आंबेडकरी व सामाजिक संघटनांचे हजारो कार्यकर्ते सहभागी झाले होते. राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे अध्यक्ष बबनराव घोलप, माजी मंत्री राजकुमार बडोले, ॲड. सुरेश माने, बाबुराव माने, डॉ. बाबा कांबळे, राजाराम पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांनी मोर्चाला संबोधित करून उपवर्गीकरणाच्या प्रस्तावाचा निषेध नोंदविला.

रायगड जिल्ह्यातूनही मोठ्या संख्येने समाजबांधवांनी या आंदोलनात सहभाग घेतला. माणगाव तालुका बौद्धजन पंचायत समितीचे अध्यक्ष रविंद्र मोरे, मुंबई उच्च न्यायालयाचे ज्येष्ठ विधिज्ञ नरेश जाधव, विनोद मोरे, रणजित मोहिते, संदेश साळवी यांच्यासह शेकडो पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोर्चात सहभागी झाले. तसेच भारतीय बौद्ध महासभेचे रायगड दक्षिण जिल्हाध्यक्ष संतोष जाधव, जिल्हा सरचिटणीस नवनित साळवी, नितीन मोरे, रवींद्र गायकवाड यांच्यासह विविध तालुक्यांतील पदाधिकाऱ्यांनीही मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. तळा, माणगाव, महाड, म्हसळा, रोहा, श्रीवर्धन, पोलादपूर तसेच गोरेगाव विभागातील बत्तीस गाव पंचशील बौद्धजन सेवा संघाचे पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले. महिला आणि युवकांचा उत्स्फूर्त सहभाग मोर्चाचे विशेष आकर्षण ठरला. मोर्चादरम्यान संपूर्ण वातावरण संविधाननिष्ठ, शिस्तबद्ध आणि शांततापूर्ण राहिले. हातात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार, भारतीय राज्यघटनेच्या प्रती आणि निळे झेंडे घेऊन सहभागी झालेल्या नागरिकांनी सामाजिक समता आणि संविधानिक हक्कांचे संरक्षण करण्याची शपथ घेतली. मोर्चातील प्रमुख मागण्या अनुसूचित जाती आरक्षणातील अ, ब, क, ड उपवर्गीकरणाचा प्रस्ताव तात्काळ मागे घ्यावा. अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या मूळ स्वरूपाला कोणताही धक्का लागू देऊ नये. समाजात फूट पाडणारे किंवा सामाजिक सलोखा बिघडविणारे निर्णय घेऊ नयेत. भारतीय राज्यघटनेतील सामाजिक न्यायाच्या तत्त्वांचे काटेकोर पालन करावे. मोर्चाच्या समारोपानंतर प्रतिनिधी मंडळाने शासनाला निवेदन सादर केले. संविधानिक हक्क, सामाजिक समता आणि आरक्षणाच्या संरक्षणासाठी आवश्यक असल्यास राज्यभर अधिक तीव्र आंदोलन उभारण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला. पावसाची पर्वा न करता लाखोंच्या संख्येने झालेल्या या मोर्चामुळे अनुसूचित जाती आरक्षणातील उपवर्गीकरणाचा मुद्दा पुन्हा एकदा राज्याच्या राजकीय आणि सामाजिक चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे.

### स्थानांतरणानंतर पोलिसांना...

निरीक्षण केले.न्यायालयाने कामगार न्यायालयाचा हा निष्कर्ष स्वीकारण्यास नकार दिला की, पाटील १८ मे रोजीच त्यांच्या स्थानांतरण आदेशानुसार वाशी शाखेत रुजू झाल्या होत्या. ''त्या १८ मे रोजी सकाळी ७.४५ वाजता वाशी शाखेत रुजू झाल्या याचा अर्थ असा नाही की त्यांनी पोलिसांना शाखेच्या कार्यालयात आणून व्यवस्थापकाची चौकशी करून गैरवर्तन केले नाही. आरोपपत्रात कधीही स्थानांतरण आदेशाचे पालन न केल्याचा आरोप नव्हता. त्यामुळे, कामगार न्यायालयाने दिलेल्या निर्णयांमधील निष्कर्ष प्रत्यक्षात विकृत आहेत,'' असे न्यायमूर्ती मारणे यांनी म्हटले.

कामगार न्यायालयाच्या निष्कर्षांबाबत, संबंधित व्यवस्थापकाला पोलीस किंवा पाटील यांच्याकडून कोणतीही हिंसा किंवा अपमानास्पद भाषा वापरली गेली नाही, त्यामुळे त्यांचे कृत्य गैरवर्तन नाही, असे म्हटले होते.

''हे निष्कर्ष पुन्हा पूर्णपणे विकृत आहेत. बँकेने कधीही हिंसा, गरम चर्चा किंवा अपमानास्पद भाषेच्या गैरवर्तनाचा आरोप केला नव्हता. त्यांच्यावरील आरोप स्पष्ट आणि साधा होता. पोलिसांना बँकेच्या कार्यालयात आणून त्यांच्या स्थानांतरणाबद्दल प्रश्न विचारणे हे बँकेने गैरवर्तन मानले आहे आणि त्यामुळे कामगार न्यायालयासमोरचा साधा मुद्दा हा होता की, स्थानांतरणाच्या तक्रारीसह पोलिसांकडे जाणे आणि पोलिसांना बँकेच्या कार्यालयात आणून अधिकाऱ्याची चौकशी करणे हे गैरवर्तन आहे की नाही. या पैलूवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी, कामगार न्यायालयाने स्वतः ला पूर्णपणे चुकीच्या दिशेने नेले आणि केवळ हिंसा आणि अपमानास्पद भाषेच्या अनुपस्थितीमुळे तिला चुकीने क्लीन चिट दिली,'' असे न्यायमूर्ती मारणे यांनी मत व्यक्त केले. पुढे, न्यायाधीशांनी असे म्हटले की, औद्योगिक न्यायालयाने, ज्याने कामगार न्यायालयाचे निष्कर्ष देखील कायम ठेवले होते, त्यांनी त्यांच्या पुनरीक्षण अधिकारक्षेत्राचा भौतिक अनियमिततेने वापर केला होता, कारण त्यांनी या आरोपाबाबत कामगार न्यायालयाच्या निष्कर्षांमधील विकृतीचा पूर्णपणे दुर्लक्ष केला. पाटील यांच्यावरील दुसरा आरोप असा होता की, त्यांनी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, केंद्र सरकार, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग यासह विविध असंबंधित प्राधिकरणांकडे बँकेच्या कामकाजाबद्दल अनेक आणि गंभीर आरोप केले होते. त्यांनी प्रामुख्याने प्रतिपूर्ती, गृहकर्ज न मिळणे, दुरुस्ती नोंदी, युनियन शुल्कासाठी केलेल्या कपाती, वरिष्ठांनी त्यांच्याशी वापरलेले अनुचित शब्द, हमीशी संबंधित कागदपत्रे न देणे, ड्रायव्हरपेक्षा कमी पगार मिळणे इत्यादींबाबत विविध तक्रारी केल्या होत्या.

न्यायाधीशांनी नमूद केले की, विविध प्राधिकरणांकडे तक्रारी केल्यानंतर, या प्राधिकरणांनी बँकेकडून स्पष्टीकरण मागवले होते. ''संस्थेमध्ये सेवा-संबंधित तक्रारी मांडणे हा कर्मचाऱ्याचा अधिकार आहे. तथापि, पाटील यांनी या प्रकरणात बँकेच्या कामकाजाबाबत विविध प्राधिकरणांकडे, त्यापैकी काही बँकिंग कामकाजाशी संबंधित नसलेल्या, आरोप करून मर्यादा ओलांडली आहे. हे गंभीर गैरवर्तन आहे की नाही, हे अंतिम निवाडा करताना ठरवले जाऊ शकते. तथापि, या टप्प्यावर असे म्हणणे खूप दूरचे आहे की, त्या निवेदने आणि तक्रारी करून त्यांनी कोणतेही गैरवर्तन केले नाही. जर तक्रारी आणि निवेदने त्यांच्या स्वतःच्या सेवा-संबंधित तक्रारींपुरती मर्यादित असती आणि त्या बँकेतील उच्च अधिकाऱ्यांकडे केल्या असत्या, तर हे कृत्य गैरवर्तन ठरले नसते. तथापि, त्यांनी त्यांच्या वैयक्तिक सेवा-संबंधित तक्रारींच्या पलीकडे जाऊन बाहेरील प्राधिकरणांकडेही तक्रारी दाखल केल्या आहेत,'' असे न्यायमूर्ती मारणे यांनी म्हटले.

या निरीक्षणांसह, खंडपीठाने हे प्रकरण कामगार न्यायालयाकडे पुनर्विचारासाठी परत पाठवले आणि शक्यतो सहा महिन्यांच्या आत अंतिम आदेश पारित करण्याचे निर्देश दिले.बँकेसाठी अधिवक्ता रीटा जोशी, अशोक शेट्टी आणि बुशरा मुगल उपस्थित होते.कर्मचाऱ्यासाठी अधिवक्ता रवींद्र नायर उपस्थित होते.प्रकरणाचे शीर्षक: अभ्युदय को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड विरुद्ध स्मिता वीरेंद्र पाटील (रिट याचिका क्रमांक १०९२९ सन २०२४)

अधिवक्ता महेश एस. धन्नावत, अध्यक्ष, ग्राहक अधिवक्ता संघटना, जालना यांचे मत:''मुंबई उच्च न्यायालयाचा हा निकाल कर्मचाऱ्यांच्या गैरवर्तनावर एक महत्त्वाचा संदेश देतो. कर्मचाऱ्यांनी आपल्या तक्रारी योग्य मार्गाने आणि संस्थेच्या अंतर्गतच मांडणे अपेक्षित आहे. स्थानांतरणासारख्या प्रशासकीय निर्णयांवरून थेट पोलिसांना कार्यालयात आणणे किंवा असंबंधित बाह्य प्राधिकरणांकडे बँकेच्या कामकाजाबद्दल गंभीर आरोप करणे हे कोणत्याही परिस्थितीत स्वीकारार्ह नाही. यामुळे संस्थेच्या प्रतिमेला आणि कार्यप्रणालीला बाधा येते. या निर्णयामुळे कर्मचाऱ्यांनी आपल्या अधिकारांचा वापर करताना जबाबदारीने वागावे लागेल आणि गैरवर्तनाचे गंभीर परिणाम होऊ शकतात हे स्पष्ट झाले आहे. कामगार न्यायालयाचा निर्णय विकृत ठरवून प्रकरण पुनर्विचारासाठी पाठवणे हे न्यायव्यवस्थेचे योग्य पाऊल आहे.''

### जालना समाजकार्य..

सदैव कटिबद्ध असून कृषी क्षेत्रात महिला शेतकऱ्यांचा सहभाग व सन्मान अधिक वाढला पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शेतीनिष्ठ कृषी पुरस्कार प्राप्त शेतकरी पांडुरंग डोंगरे व कपिल बनसोडे यांनी आपल्या शेतीतील यशस्वी प्रयोगांचे अनुभव कथन केले.

कृषी विज्ञान केंद्र, बदनापूर येथील शास्त्रज्ञ सौ. दिपाली कांबळे यांनी खरीप हंगामातील प्रमुख पिकांच्या व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन केले. तर कृषी विज्ञान केंद्र, खरपुडी येथील शास्त्रज्ञ पंडित वासरे यांनी एल-निनोच्या प्रभावामुळे शेतीवर होणारे परिणाम, त्यावरील उपाययोजना आणि व्यवस्थापन याविषयी सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कै. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर विविध कृषी पुरस्कारप्राप्त शेतकरी, पिक स्पर्धेतील विजेते तसेच शेती क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांचा प्रतिनिधिक स्वरूपात सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास जिल्ह्यातील प्रगतशील शेतकरी, विविध पुरस्कारप्राप्त शेतकरी, पिक स्पर्धेतील विजेते, शेतकरी उत्पादक कंपन्यांचे सभासद तसेच मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कृषी विकास अधिकारी पी. बी. बनसावडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन कृषी अधिकारी अजय सहाने यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा परिषद कृषी विभागातील निलेश भदाणे, विशाल गायकवाड, वसंत मदन, चव्हाण, बनसोडे, पटेकर, मावकर तसेच इतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### दुर्गा माता मंदिर....

आणि पर्यावरणामध्ये सकारात्मक बदल घडवण्याचा आमचा प्रयत्न राहील, असे त्यांनी नमूद केले.

प्रकल्प प्रमुख प्रतीक नानावटी आणि सागर दक्षिणी यांनी प्रकल्पाची सविस्तर माहिती दिली. हा ट्रॅक मंदिराच्या चारही बाजूने चौकोनी आकारात साधारण ६०० ते ६५० मीटर लांबीचा असेल. ट्रॅकच्या कोपऱ्यांवर रोटरीच्या सामाजिक संदेशांचे फलक लावून त्याचे सुशोभीकरण केले जाईल. तिथे मऊ वाळू टाकून मुलांसाठी एक विशेष प्ले-एरिया विकसित केला जाणार आहे, जेणेकरून पालक फिरत असताना मुले तिथे सुरक्षित खेळू शकतील. पोलीस प्रशिक्षण विद्यालयाचे अशोक बनकर, महानगरपालिका आणि समस्त महाजन ट्रस्ट व उदय शिंदे यांच्या सहकार्यामुळेच हा भव्य प्रकल्प आकारास येत असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी डॉक्टर्स डे आणि सीए डेनिमित्त डॉक्टर आणि सीए यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजनंदिनी राठौर यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार क्लबचे सचिव मनमोहन भक्कड यांनी मानले. कार्यक्रमाला क्लबचे पदाधिकारी आणि रोटरी परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘जलपरी’ गीता मालुसरेची इंग्लिश चॅनेलला गवसणी संघर्षातून घडलेली यशोगाथा


निसर्गाने पोहण्याची कला मानव सोडून सर्वांना दिली आहे. मानवाचा अपवाद वगळता कोणत्याही प्राण्याला जलतरण किंवा पोहणे शिकवावे लागत नाही. कुठल्याही प्राण्याचे लहान पोर जरी पाण्यात पडले तरी चटकन पाय मारून पोहण्यास सुरुवात करते. उपजतच त्यांना जलतरणाची कला अवगत असते. परंतु माणसाच्या पोराला मात्र ही कला मुद्दाम शिकवावी लागते. अगदी पूर्वापार काळात मानवाने ही कला केव्हा आत्मसात केली याची अचूक माहिती मिळणे अशक्य आहे. परंतु गेली हजारो वर्षे मानवाला ही कला अवगत आहे यात शंका नाही. माणसास मात्र पोहणे प्रयत्न पूर्वक करावे लागते ही कला जीवन मरणाशी निगडीत आहे, पोहता आल्यामुळे जीव वाचल्याचे व पोहता नआल्यामुळे जीव गमावल्याचे आपल्याभोवती आपण नेहमी पाहतो. पाणी हे जसे मनुष्यास तारते तसेच ते मनुष्यास मारते सुद्धा. माणूस जसा पाणी पिवून जगतो तसाच तो पोहता न येण्यामुळे पाणी पिवून पिवून सुद्धा मरतो. त्यामुळे आताच्या काळात पोहणे म्हणजेच हे आपणास येणे जरूरीचे आहे.अत्यावश्यक आहे. पोहणे ही कला : पाण्यात पोहताना जीव वाचवण्याचे शास्त्र सर्वात किती महत्त्वाचे आहे. हे पुढील गोष्टीतून वाचण्यासारखे आहे. एकदा गणित शास्त्रज्ञ, विज्ञान शास्त्रज्ञ, भूगोल शास्त्रज्ञ व भौतिक शास्त्रज्ञ एकत्र नदी पार करत असतात. जो नाव चालवत असतो त्या कोळ्याला ते आपल्या आपल्या शाखेचे महत्व पटवून देतात व ते कसे जरूरीचे आहे हे सांगतात.

१. भूगोल शास्त्रज्ञ : ‘‘मित्रा, तू दिवसभर या नदीत नाव चालवतोस. पण तू कधी विचार केला आहेस का की, या नदीचा उगम कुठे झाला? हिमालयातील कोणत्या शिखरावरून ती खाली येते? नदीच्या प्रवाहातील खडकांची रचना कशी आहे? या सर्वांचा अभ्यास भूगोलात होतो. जर तुला नद्यांची माहिती नसेल, तर तू भरकटू शकतोस.‘‘

२. विज्ञान शास्त्रज्ञ : ‘‘नावाडी भावा, तू ज्या लाकडी नावेत बसला आहेस, ती कोणत्या झाडाची आहे? पाण्यावर तरंगण्यासाठी तिची रचना कशी असावी? नदीच्या पाण्यामध्ये कोणकोणते जलचर व खनिजे आहेत? या सर्व सजीव आणि निर्जीव सृष्टीचा अभ्यास विज्ञान () करते.‘‘

३. भौतिकशास्त्र शास्त्रज्ञ : ‘‘अरे पण, ही नाव पाण्यात बुडत नाही आणि पुढे जाते, हे कसे शक्य आहे? याला कारणीभूत आहे प्लवनशीलता () चा नियम आणि वल्हवताना लावलेले बल (). या सर्व भौतिकशास्त्राच्या () नियमांमुळेच तू नदीच्या एका टोकावरून दुसऱ्या टोकाला जाऊ शकतोस.‘‘ (तपशीलवार माहिती: )

४. गणित शास्त्रज्ञ : ‘‘मित्रा, हे तिघे जे काही सांगत आहेत, त्या सर्वांचा पाया गणित () आहे ! तू नदी पार करण्यासाठी किती वेळ घेतला, नावेचे माप काय, पाण्याचा वेग किती, आणि तू जे पैसे कमावतोस, त्या सगळ्याची आकडेवारी गणितावरच अवलंबून आहे. गणित नसेल, तर जगातले कोणतेही शास्त्र चालणार नाही.‘‘ हे सर्व ऐकून कोळी हसला आणि म्हणाला, ‘‘तुमचे ज्ञान खूप मोठे आहे, पण मला सांगा... तुम्हाला पोहायला येते का? जर वादळात ही नाव बुडाली, तर तुमचे हे चारही शास्त्र तुम्हाला वाचवू शकतील का ?गीता मालुसरेची इंग्लिश चॅनेलला गवसणी :पोहणे ही कला आहे, योग्य प्रशिक्षण, नियमित सराव आणि धाडस असेल तर या क्षेत्रात जगभर नावलौकिक मिळवू शकतो, याचे अलीकडचे उत्तम उदाहरण म्हणजे आमची लेक कुमारी गीता दिपा महेश मालुसरे. जिद्द आणि अदम्य इच्छाशक्तीवर गीता ही एक अत्यंत धाडसी आणि प्रेरणादायी आंतरराष्ट्रीय जलतरणपटू ठरली आहे. भारताची जलपरी म्हणून प्रसिद्ध गीता मुळशीची सुवर्णकन्या. सध्या पुण्याच्या कर्वे नगर भागात राहणाऱ्या गीता यांनी लहान वयातच जलतरणात अनेक विक्रम प्रस्थापित केले आहेत. गेल्याच आठवड्यात गीताने शनिवार दि.२७.६.२६





रोजी इंग्लिश चॅनेल चे अंतर १४ तास ३१ मिनिटांत पोहून पूर्ण केले. इंग्लिश चॅनेलचे अंतर ३५ किलोमीटर आहे. काल समुद्रातील आव्हानात्मक लाटांमुळे गीता प्रत्यक्ष पोहताना हे अंतर ५४ किलोमीटर झाले. इंग्लिश चॅनेल स्विमिंग असोशिएशन या संस्थेच्या निगराणीत ही मोहीम पार पडली.गीता अंतरराष्ट्रीय कोच शेखर खासनीस आणि प्रतिक जावडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करत आहे त्यांचे सहकार्य लाभले. अतिशय खडतर शस्त्रक्रिया, दीर्घकाळचा संघर्ष आणि दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर गीता यांनी पुन्हा पाण्यात उतरण्याचे आपले स्वप्न पूर्ण केले. त्यांनी अत्यंत कमी वयात भारताची जलपरी म्हणून ओळख मिळवत, इंग्लिश खाडी पोहून पार करण्याचा ऐतिहासिक पराक्रम केला आहे. गेले वर्षभर दररोज आठ तास तर कधी दहा तास गीताने सराव केला. हातावरच्या खोल जखमा सुकलेल्या नसताना, हातातून रक्त येत असतानाही ती कधी थांबली नाही. काल इंग्लिश चॅनेल पोहत असतानाही तिला या जुन्या जखमांचा प्रचंड त्रास होत होता. मात्र, असह्य वेदनांकडे दुर्लक्ष करत तिने आपले लक्ष फक्त स्वप्नावर केंद्रित केले आणि अखेर इतिहास रचला ! जागतिक जलतरण क्षेत्रातील अत्यंत अवघड मानली जाणारी इंग्लिश खाडी गीताने यशस्वीरीत्या पार केली आहे. आठ दिवसांपुर्वी इंग्लडमध्ये प्रॅक्टीस करताना जेली फीशने पुन्हा एकदा गीताला दंश केला. सुदैवाने हा दंश विशारी नव्हता. इंग्लिश खाडीत पोहत असताना जुन्या जखमांच्या वेदना ठणकत होत्या आणि जेलीफिशचे मानसिक दडपणही होते, मात्र वेदनांना विसरून ती फक्त आपल्या ध्येयाकडे झेपावत राहिली. इतका संघर्ष करून मिळवलेले हे यश जगाच्या पाठीवर खरोखरच एकमेवाद्वितीय आहे. गीताने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मिळवलेले हे यश जगभरात कौतुकास पात्र आहे. गीताचा हा यशस्वी प्रवास मात्र प्रचंड संघर्षमय आहे. वयाच्या अवघ्या तिसऱ्या वर्षापासून पोहायला सुरुवात करत बघता बघता या प्रतिभावान जलतरणपटूने राष्ट्रीय स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली.

गीताचा संघर्ष प्रेरणादायी :

गीताचा हा संघर्षमय यशस्वी प्रवास युवा पिढीला कायम प्रेरणा देणारा राहील. मुली कोणत्याच क्षेत्रात कमी नाहीत. त्यामुळे ‘बेटी बचाओ, बेटी पढाओ’ हा संदेश देण्यासाठी १३ व्या वाढदिवशी उदयोन्मुख जलतरणपटू गीता महेश मालुसरे हिने मुंबईतील प्राँग्ज लाइट हाउस ते गेट वे ऑफ इंडिया ते वाशी खाडी पूल हे समुद्रातील ३१ किलोमीटर अंतर अवघ्या ४ तास ५५ मिनिटांत पोहून पार केले. ही मोहीम पार पाडताना जसजसे ऊन वाढत चालले तसतशा लाटा वाढू लागल्या व तिला पोहण्यासाठी अडथळा येऊ लागला. समुद्रातील अत्यंत खारट पाणी, मुंबईला लागून असल्यामुळे प्रचंड घाण पाणी, उन्हाचा तडाखा आणि वाढत असलेल्या लाटांचा तिला खूप त्रास होऊ लागला. त्यामुळे तिला दोन वेळा उलटीही झाली; परंतु संकल्प पूर्ण करण्याच्या निश्चयाने तिचा उत्साह वाढतच होता. सगळ्या परिस्थितीवर मात करून ती पुढे सरकत होती. समुद्रात गस्त घालणारे महाराष्ट्र पोलिस व सैनिक चौकशी करून तिला शुभेच्छा देत होते. दरम्यानच्या काळात वाढत्या लाटांमुळे तिची पोहण्याची गती थोडी मंदावली होती; परंतु ध्येय नजरेत आल्यामुळे शेवटच्या १५ मिनिटांत तिने पोहण्याचा वेग सुरुवातीपेक्षाही वाढवला.

जेलीफिशचा जीवघेणा भयंकर हल्ला :

डिसेंबर २०२२ मध्ये इस्त्राईलला होणाऱ्या स्पर्धेत गीताला भाग घेतला, त्यात ती स्पर्धेत दुसरी आली. नोव्हेंबर महिन्यात मध्ये रत्नागिरी येथील सागरी स्पर्धेत पोहत असताना गीताला जेलीफिश या विषारी जलचराचा तीव्र दंश झाला. तिचा हात निकामी होण्याचा धोका निर्माण झाला होता. हात वाचवण्यासाठी व वेदनांवर मात करत त्यांना तब्बल ११ शस्त्रक्रिया सहन कराव्या लागल्या. त्यामुळे गीताचे स्विमिंग करिअर संपले असे वाटत होते. आपला स्विमींगमधलं () आपलं उज्ज्वल करिअर वाचवण्याची धडपड करणाऱ्या एका राष्ट्रीय जलतरणपटूच्या चॅम्पियन बनण्याच्या स्वप्नांना तेव्हा ब्रेक लागला होता. हात कढून टाकण्याची वेळ तिच्यावर येईल की काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती. दोन वर्षांपूर्वी त्यावेळी डॉक्टरांच्या समोर उपचारासाठी अशी केस भारतातली पहिलीच होती. मात्र गीताचा प्रवास असाच सुरू राहावा, समुद्रात लांब पल्ले गाठण्यासाठी तिची झुंज अशीच सुरू राहावी, भारतासाठी खेळण्याचा तिचा निर्धार अधिक पक्का व्हावा यासाठी डॉक्टरांनी अहोरात्र प्रयत्न केले,

इतक्या कमी वयात एवढ्या मोठ्या संकटाला तोंड देणं आणि हिंमतीने सामोरं जाणं अतिशय अवघड होतं, पण शारीरिक दुर्बलतेला सामोरे जावे लागणार हे आव्हान गीताने हसतमुखाने स्वीकारले. आपल्याला देशासाठी क्वीन ऑफ द ओशन पुरस्कार मिळवण्याचं स्वप्नं गीता मनाशी बाळगून गीता या संकटाने खचली नाही. स्विमींगमध्ये करिअर करायचे आहे हा निर्धार ढळू दिला नाही, डॉक्टरांचे उपचार आणि दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर गीताने पुन्हा एकदा पाण्यात उतरून पोहण्याचं स्वप्न पूर्ण केले. पुन्हा पाण्यात सूर मारण्यासाठी गीताची जिद्द आणि इच्छाशक्ती सर्वानाच अचंबित करणारी ठरली आहे.

गीताचे ध्येय: क्वीन ऑफ ओशन :

इंग्लिश चॅनेल पार करून गीता थांबणार नाही, तर तिचे मुख्य ध्येय जागतिक कीर्तीचा ‘क्वीन ऑफ ओशन’ ( ) हा बहुमान मिळवण्याचे आहे. यासाठी तिला जगातील सात प्रमुख खाड्या पोहायच्या असून, या ‘सेव्हन ओशन चॅलेंज’ची तिने धडाक्यात सुरुवात केली आहे. याच मोहिमेचा भाग म्हणून ती याच वर्षी ऑगस्टमध्ये न्यूयॉर्कमधील ४६ किलोमीटरची ‘ट्रेंटी ब्रिजेस’ आणि सप्टेंबरमध्ये कॅलिफोर्नियातील ३२ किलोमीटरची ‘कॅटेलिना चॅनेल’ पार करण्यासाठी सज्ज झाली आहे. ज्या स्विमिंगमुळे हात गमावण्याची वेळ आली होती, त्याच क्षेत्रात जागतिक कीर्ती प्रस्थापित करणाऱ्या गीताच्या या जिद्दीला, चिकाटीला आणि आत्मविश्वासाला आज अवघा देश सलाम करत आहे.

गीताला नेहमीच आई वडिलांचे प्रोत्साहन मिळत आहे, नियमित सराव, तिचा डाएट यावर ते आणि प्रशिक्षक लक्ष ठेवून असतात. मात्र तिची अविश्रांत मेहनत आणि आत्मविश्वास तिला भविष्यात आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये मोठं यश मिळवून देऊ शकते असा त्यांचा आत्मविश्वास आहे. नदी पार करताना घडलेला हा एक प्रसिद्ध आणि मजेशीर किस्सा आहे. खालील संवादात गणित, विज्ञान, भूगोल आणि भौतिकशास्त्र या विषयांचे महत्त्व एका कोळ्याला कसे पटवून दिले, हे स्पष्ट केले आहे:

**- रवींद्र मालुसरे**
**अध्यक्ष, मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई**
**संपर्क : ९३२३११७७०४**

## माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानभवनात भाषणे थांबवा; आधी जालन्यातील मृत्यूचे सापळे झाका; ॲड. धन्नावत उपोषणाच्या तयारीत

**जालना -प्रतिनिधी**




शहरातील उघड्या मलनिस्सारण झाकणांमुळे जीवघेण्या अपघातांची मालिका सुरूच असून, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. महेश धन्नावत यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि विरोधी पक्षनेत्यांवर निशाणा साधला आहे. ‘‘विधानभवनात एकमेकांवर चिखलफेक करणे थांबवा. आधी जालन्यातील रस्त्यांवरील मृत्यूचे सापळे झाका. जनतेच्या जीवापेक्षा अधिवेशन मोठे नाही,’’ असा खरमरीत इशारा ॲड. धन्नावत यांनी दिला आहे.

गेल्या तीन आठवड्यापूर्वी कालीकुर्ती भागात लागलेल्या आगीत, असमान आणि उघड्या मलनिस्सारण झाकणामुळे अग्निशमन दलाची गाडी घटनास्थळी पोहोचूच शकली नाही. त्याच असमान झाकणाची दुरुस्ती करण्याऐवजी ते आजही उघडे ठेवण्यात आले आहे. काल याच उघड्या झाकणात एक गाय आणि एक चारचाकी गाडी कोसळली. सुदैवाने जीवितहानी टळली, पण शहरात अनेक ठिकाणी मलनिस्सारण झाकणे उघडीच आहेत. काही ठिकाणी पोलीस विभागाने केवळ लोखंडी कठडे लावून वेळ मारून नेली आहे. ॲड. धन्नावत म्हणाले, ‘‘तक्रारी करून, बातम्या देऊनही प्रशासन ढिम्म आहे. जालन्यातील प्रत्येक रस्ता हा आज सापळा बनला आहे. मुले, वृद्ध, जनावरे कधीही बळी पडू शकतात. मुख्यमंत्री आणि विरोधी पक्षनेते अधिवेशनात जनतेच्या प्रश्नांवर चर्चा करण्याऐवजी एकमेकांची उणीदुणी काढण्यात धन्यता मानत आहेत. तुमची भाषणे जनतेचे प्राण वाचवू शकत नाहीत. आधी रस्त्यावर उतरा आणि झाकणे बंद करा. त्यांनी पुढे इशारा दिला की, *‘‘जर येत्या सात दिवसांत जालन्यातील सर्व उघडी मलनिस्सारण झाकणे झाकली गेली नाहीत, तर मी स्वतः जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसेन. एकाही नागरिकाचा किंवा मुक्या जनावराचा बळी गेला, तर त्याची जबाबदारी थेट मुख्यमंत्री आणि स्थानिक प्रशासनावर राहील. शहरातील गांधीनगर, मंठा चौफुली, अंबड रोड, बसस्थानक परिसर अशा वर्दळीच्या ठिकाणी आजही झाकणे उघडी असून, रात्रीच्या वेळी तर हा धोका अधिकच वाढतो. नागरिकांमध्ये प्रशासनाविरोधात प्रचंड संताप असून, ॲड. धन्नावत यांच्या इशाऱ्यानंतर आता शासन काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## अमृतची हरित ऊर्जा क्षेत्राकडे वाटचाल अमृत ईव्ही चार्जिंग स्टेशन

**जालना - प्रतिनिधी**

हरित ऊर्जा, स्वच्छ पर्यावरण आणि शाश्वत विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे या महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेमार्फत राज्यभर अमृत ईव्ही चार्जिंग स्टेशन व्यवसाय प्रोत्साहन उपक्रम राबविण्यात येत आहे. देशात इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वेगाने वाढत असून आगामी काळात ईव्ही चार्जिंग स्टेशनचे व्यापक जाळे उभारण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर युवक, महिला उद्योजक, स्वयं सहाय्यता गट, एमएसएमई घटक तसेच इच्छुक उद्योजकांना ईव्ही चार्जिंग स्टेशन व्यवसाय उभारण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण, तांत्रिक मार्गदर्शन, व्यवसाय सल्ला तसेच पात्र लाभार्थ्यांना अमृतच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेचा लाभ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत ईव्ही चार्जिंग स्टेशन उभारणी, संचालन व व्यवस्थापन, चार्जिंग उपकरणांची देखभाल, सौरऊर्जेवर आधारित चार्जिंग सुविधा, ग्रीन एनर्जी सेवा, ईव्ही तांत्रिक सेवा, फ्रँचायझी मॉडेल तसेच ग्रामीण भागात चार्जिंग हब उभारणी यांसारख्या क्षेत्रांमध्ये स्वयंरोजगार व रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होणार आहेत. सहभागी लाभार्थ्यांना ईव्ही क्षेत्राविषयी मूलभूत ते प्रगत प्रशिक्षण, व्यवसाय नियोजन, प्रकल्प अहवाल तयार करणे, तांत्रिक मार्गदर्शन, बाजारपेठेचा अभ्यास, व्यवसाय व्यवस्थापन तसेच संबंधित शासन योजनांची माहिती दिली जाणार आहे. या क्षेत्रातील भारतीय स्वदेशी कंपन्या व तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. ईव्ही चार्जिंग स्टेशन व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्या इच्छुकांनी .. या अधिकृत संकेतस्थळावरील योजना विभागातील या पर्यायातून ऑनलाइन अर्ज करावा. अमृतच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेचा लाभ घेण्यासाठी संस्थेच्या लक्षित गटासाठी लागू असलेल्या पात्रता व अटी लागू राहतील. अधिक माहितीसाठी अमृत जिल्हा कार्यालय, दुसरा मजला, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे किंवा मो. ७३९१०६५४७४ वर संपर्क साधावा. तसेच अमृतच्या अधिकृत संकेतस्थळावर राज्यातील सर्व जिल्हा व्यवस्थापकांचे संपर्क तपशील उपलब्ध आहेत. हरित ऊर्जा वापराला चालना देणे, पर्यावरण संरक्षणाला बळकटी देणे आणि युवक, महिला तसेच ग्रामीण उद्योजकांसाठी रोजगार व स्वयंरोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश असून जास्तीत जास्त इच्छुकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अमृत संस्थेकडून करण्यात आले आहे.

## जालना शहर महानगरपालिका, जालना

प्रशासकीय ईमारत,गांधी चौक ते रेल्वेस्टेशन रोड
जुना जालना, जालना ४३१२०३

जा.क्र./जाशमपा/मालमत्ता/2026/728 — दि.01/07/2026

**मालमत्ता विभाग**
**जाहिर प्रगटन / सुचना**

जालना शहर महानगरपालिका जालना सर्वसाधारण सभा दिनांक 06/04/2026 विषय क्र.(04) अन्वये मालमत्ता विभागातील दैनंदीन बाजार / आठवडी बाजार व इतर मक्ते यांचे जाहीर लिलाव करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.त्यानुसार या जाहिर प्रगटनाद्वारे / सुचनाद्वारे जालना शहर महानगरपालिका जालनाच्या मालमत्ता विभागा अंतर्गत जालना शहरातील खालील रकान्यामध्ये नमूद विविध मक्त्यांबाबत या कार्यालयाने निश्चित केलेल्या (ऑफर प्राईज) प्रचलित दरानुसार अभिकर्ता नेमण्यासाठी जाहीर लिलाव आयोजित करण्यात येणार आहे. सदरील सूचना ही **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949** मधील कलम 79 व 332 च्या तरतुदीनुसार प्रसिद्ध करण्यात येत आहे.

| अ.क्र. | आठवडी / दैनंदिन / मासोळी तलाव | ऑफर प्राईज | मक्त्याचा कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | महात्मा फुले मार्केट दैनंदीन बाजार जमिन भाडे वसुली मक्ता | रू.7,94,300/- | कार्यादेश दिनांकापासुन दि.31/03/2027 पर्यंत |
| 2 | महात्मा फुले मार्केट येथे श्री गणेश मुर्ती विक्री मक्ता (फक्त 10 दिवसांसाठी) | रू.3,31,500/- | श्री गणेश उत्सव फक्त 10 दिवसांसाठी |
| 3 | नुतन वसाहत दैनंदीन बाजार जमिन भाडे वसुली मक्ता | रू.2,66,500/- | कार्यादेश दिनांकापासुन दि.31/03/2027 पर्यंत |
| 4 | आठवडी रविवार बाजार जमिन भाडे वसुली मक्ता | रू.4,50,450/- | कार्यादेश दिनांकापासुन दि.31/03/2027 पर्यंत |
| 5 | आठवडी सोमवार बाजार जमिन भाडे वसुली मक्ता | रू.1,43,000/- | कार्यादेश दिनांकापासुन दि.31/03/2027 पर्यंत |
| 6 | आठवडी मंगळवार बाजार जमिन भाडे वसुली मक्ता | रू.2,86,000/- | कार्यादेश दिनांकापासुन दि.31/03/2027 पर्यंत |
| 7 | आठवडी बुधवार बाजार जमिन भाडे वसुली मक्ता | रू.2,28,800/- | कार्यादेश दिनांकापासुन दि.31/03/2027 पर्यंत |
| 8 | आठवडी शुक्रवार बाजार जमिन भाडे वसुली मक्ता | रू.2,28,800/- | कार्यादेश दिनांकापासुन दि.31/03/2027 पर्यंत |
| 9 | श्री दुर्गादेवी नवरात्र यात्रा महोत्सव जमीन भाडे वसुली मक्ता ( फक्त 10 दिवसांसाठी) | रू.1,70,300/- | श्री नवरात्र महोत्सव फक्त 10 दिवसांसाठी |
| 10 | छ.संभाजी महाराज उद्यान मोतीतलाव मासोळी मक्ता | रू.3,31,500/- | कार्यादेश दिनांकापासुन दि.31/03/2027 पर्यंत |
| 11 | **छत्रपती संभाजी महाराज उद्यान येथील विविध मक्ते** | रू.7,95,950/- | कार्यादेश दिनांकापासुन दि.31/03/2027 पर्यंत |
| अ | छ.संभाजी महाराज उदयान प्रवेश शुल्क रू.1,64,450/- | | |
| ब | छत्रपती संभाजी महाराज उद्यान येथे बॅटरीवर चालणारे टॉय कार चा मक्ता. रू.1,10,500/- | | |
| क | छत्रपती संभाजी महाराज उद्यान येथे जंपींग पॅड व जंपींग मिकी माऊस चालविणे मक्ता. रू.2,21,000/- | | |
| ड | छत्रपती संभाजी महाराज उद्यान येथे आभासी वास्तव केंद्र ( Virtual Reality Spot) चालविणे मक्ता. रू.3,00,000/- | | |

करीता शहरातील विविध एजन्सीधारक / नागरीक / आस्थापना / इच्छुक अभिकर्त्यांनी सदरील लिलालामध्ये भाग घेण्यासाठी सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन दिनांक 02/07/2026 ते दिनांक 08/07/2026 पर्यंत ( सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळता) दुपारी 03.00 वाजेपर्यंत या कार्यालयात बोलीमध्ये सहभागी होण्यासाठीचे शुल्काची रक्कम रू.50,000/- (अक्षरी रूपये पन्नास हजार मात्र ) आवश्यक कागदत्रांसह धनाकर्ष (डी.डी.) द्वारे भरणा करणे आवश्यक राहील. याबाबतच्या अटी व शर्ती तसेच अधिक माहिती मालमत्ता विभागात उपलब्ध आहे.

**( अधिक माहिती करीता jcmcjalna.org या संकेतस्थळास भेट देणे )**

**- स्वाक्षरीत-**
अंजली शर्मा ( भा.प्र.से.)
आयुक्त
जालना शहर महानगरपालिका

# एससी उपवर्गीकरणा विरोधात मुंबईत आंबेडकरी समाजाचा विराट एल्गार; निळ्या जनसागराने दणाणली मायानगरी

## राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाखोंचा सहभाग; मुसळधार पावसातही संविधान बचाव आणि आरक्षण वाचविण्याचा निर्धार

**मुंबई । प्रतिनिधी**

अनुसूचित जाती (एससी) आरक्षणातील अ, ब, क, ड उपवर्गीकरणाच्या प्रस्तावाविरोधात मंगळवारी (३० जून) मुंबईत आंबेडकरी समाजाने अभूतपूर्व शक्तिप्रदर्शन करत विराट मोर्चा काढला. भारतीय बौद्ध महासभेचे कार्याध्यक्ष भिमराव आंबेडकर आणि बौद्धजन पंचायत समितीचे सभापती तथा रिपब्लिकन सर सेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली मेट्रो सिनेमा ते विधानभवन असा हा मोर्चा निघाला. राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या हजारो समाजबांधवांनी निळे झेंडे आणि भारतीय राज्यघटनेच्या प्रती हातात घेत संविधान रक्षणाचा निर्धार व्यक्त केला.



मुंबईतील मुसळधार पावसाची तमा न बाळगता हजारो महिला, युवक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी झाले. निळ्या झेंड्यांनी आणि जयभीमच्या घोषणांनी संपूर्ण परिसर निळामय झाला होता. ''संविधान बचाव'', ''आरक्षण वाचवा'', ''उपवर्गीकरण रद्द करा'' अशा घोषणांनी विधानभवन परिसर दणाणून गेला.

मोर्चाला संबोधित करताना भिमराव (पान २ वर)

# स्थानांतरणानंतर पोलिसांना कार्यालयात आणणे, वरिष्ठ अधिकाऱ्यांची चौकशी करणे आणि बाह्य प्राधिकरणांकडे तक्रारी करणे हे गैरवर्तन मा. उच्च न्यायालय

## कर्मचारी गैरवर्तनावर मुंबई उच्च न्यायालयाचा महत्त्वाचा निकाल

**मुंबई - प्रतिनिधी**

उच्च न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या एका महत्त्वपूर्ण निर्णयात असे म्हटले आहे की, कर्मचाऱ्याने नियमित स्थानांतरणानंतर पोलिसांना कार्यालयात आणून मालकाला त्रास देणे हे गैरवर्तन आहे. तसेच, स्थानांतरण झाल्यावर कर्मचाऱ्याने मालकाविषयी विविध संबंधित आणि असंबंधित प्राधिकरणांकडे गंभीर आरोप करणे हे देखील गैरवर्तन ठरते.

न्यायमूर्ती संदीप मारणे यांनी १८ जून रोजी अभ्युदय को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडच्या बाजूने निकाल दिला. बँकेने ठाणे येथील कामगार न्यायालयाच्या १ सप्टेंबर, २०२३ च्या आदेशाला आव्हान दिले होते,. कामगार न्यायालयाने बँकेने कर्मचारी स्मिता पाटील यांच्याविरुद्ध केलेली चौकशी योग्य ठरवली होती, परंतु चौकशीचे निष्कर्ष विकृत असल्याचे म्हटले होते.

न्यायमूर्ती मारणे यांनी नमूद केले की, पाटील यांची सुरुवातीला पुणे शाखेत नियुक्ती झाली होती, परंतु ८ जून, २०११ रोजी त्यांची मुंबई शाखेत बदली करण्यात आली आणि १७ मे, २०१२ रोजी त्यांना वाशी (नवी मुंबई) शाखेत स्थानांतरित करण्यात आले. त्यांना १८ मे, २०१२ रोजी वाशी शाखेत रुजू होण्यास सांगितले होते. मात्र, मुंबई शाखेतून कार्यमुक्त झाल्यानंतर त्यांनी दोन पोलिसांना मुंबई कार्यालयात आणले आणि मनमानी स्थानांतरण आदेशांमुळे आपल्याला त्रास दिला जात असल्याचा आरोप केला. पोलिसांनी नंतर एचआर व्यवस्थापकाची स्थानांतरणाबाबत चौकशी केली आणि नंतर ते बँकेच्या परिसरातून निघून गेले.

न्यायमूर्ती मारणे यांनी म्हटले की, ''जेव्हा बँकेच्या अधिकाऱ्याची पोलिसांकडून चौकशी केली जाते, तेव्हा तो अधिकारी भयभीत होतो. पाटील यांनी पोलिसांकडे जाऊन वाशी शाखेतील त्यांच्या स्थानांतरणाबद्दल तक्रार करणे हेच गैरवर्तन आहे. जर त्यांना वाशी शाखेतील स्थानांतरणाबद्दल काही तक्रार असती, तर त्यांनी बँकेच्या अधिकाऱ्यांकडे निवेदन देऊन योग्य मार्ग अवलंबायला हवा होता. त्यांनी स्थानांतरणाबद्दल पोलिसांकडे तक्रार करायला नको होती. या प्रकरणात, त्यांनी केवळ पोलिसांकडे तक्रार केली नाही, तर दोन पोलिसांना शाखेत आणले आणि त्यांना त्रास दिला जात असल्याचा आरोप केला. बँकेच्या अधिकाऱ्याची त्यांच्या स्थानांतरणाचे नेमके कारण विचारण्यासाठी पोलिसांना आणण्यात आले होते. त्यांचे हे वर्तन निःसंशयपणे गैरवर्तन आहे.'' कामगार न्यायालयाने पाटील यांच्यावरील हा आरोप स्थानांतरण आदेशाचे पालन न करण्याशी संबंधित आहे असे चुकीचे वाचले, असे न्यायालयाने (पान २ वर)

# हरित क्रांतीचे शिल्पकार वसंतराव नाईक यांना जयंतीनिमित्त अभिवादन



**जालना - प्रतिनिधी**

विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, जालना येथे हरित क्रांतीचे प्रणेते व महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक यांची ११३ वी जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे महाराष्ट्रात कृषी क्षेत्रात झालेल्या परिवर्तनाचा तसेच शेतकरी आणि ग्रामीण विकासासाठी त्यांनी दिलेल्या उल्लेखनीय योगदानाचा यावेळी गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाला सहाय्यक समाजकल्याण आयुक्त स्नेहल मोदाळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. तसेच बाळू जाधव (अध्यक्ष, जवाहरलाल बहुउद्देशीय सेवाभावी संस्था), जयपाल राठोड (अध्यक्ष, युवा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था), कृष्णा भालेराव, श्रीकांत राठोड, इंजि. संभाजी देशमुख, सानप साहेब, चेतन राठोड, माणिक चव्हाण तसेच महामंडळाचे अधिकारी, कर्मचारी आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महानगरपालिका ते नीलम टॉकीज दरम्यानचा पूल तातडीने दुरुस्त करा; अन्यथा आंदोलनाचा इशारा

## लगतच्या नाल्याचीही त्वरित साफसफाई करा - राजेंद्र जाधव

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील महानगरपालिका ते नीलम टॉकीज, म्हसोबा मंदिरासमोरील पुलाची तातडीने दुरुस्ती व पुनर्बांधणी करण्यात यावी, तसेच पुलालगतच्या नाल्याची त्वरित साफसफाई करून पावसाळ्यापूर्वी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गट) युवक शहराध्यक्ष राजेंद्र जाधव यांनी प्रशासनाकडे केली आहे. मागणीची दखल न घेतल्यास नागरिक व व्यापाऱ्यांच्या हितासाठी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. राजेंद्र जाधव यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गेल्या वर्षी झालेल्या मुसळधार पावसामुळे महानगरपालिका ते नीलम टॉकीज परिसरातील अनेक दुकाने, व्यावसायिक आस्थापने आणि व्यापाऱ्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागले होते. पावसाचे पाणी दुकानांमध्ये शिरल्याने लाखो रुपयांचे साहित्य, मालसाठा आणि व्यावसायिक उपकरणांचे नुकसान झाले. अनेक व्यापाऱ्यांचा व्यवसाय अनेक दिवस ठप्प राहिला होता. या गंभीर परिस्थितीनंतर संबंधित पुलाची दुरुस्ती, पुनर्बांधणी आणि नाल्याच्या साफसफाईचे काम तातडीने होणे अपेक्षित होते. मात्र, अनेक महिने उलटूनही प्रशासनाने कोणतीही ठोस कार्यवाही केली नसल्याने व्यापारी व नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण असल्याचे त्यांनी सांगितले.



त्यांच्या म्हणण्यानुसार, पुलालगतचा नाला मोठ्या प्रमाणात गाळ, प्लास्टिक कचरा आणि झुडपांनी भरलेला असून पाण्याचा नैसर्गिक प्रवाह अडथळित झाला आहे. परिणामी, मुसळधार पाऊस झाल्यास पाणी तुंबून पुन्हा दुकाने, घरे आणि रस्त्यांमध्ये शिरण्याची भीती व्यक्त होत आहे. वेळेत नाल्याची साफसफाई न झाल्यास परिस्थिती अधिक गंभीर होऊ शकते, असा इशाराही त्यांनी दिला.

राजेंद्र जाधव यांनी प्रशासनावर दुर्लक्षाचा आरोप करत सांगितले की, या प्रश्नासंदर्भात महानगरपालिकेला अनेक वेळा निवेदने देण्यात आली असून संबंधित अधिकाऱ्यांचे लक्षही वेधण्यात आले आहे. मात्र, अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. त्यामुळे व्यापाऱ्यांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे. मागील वर्षी झालेल्या पावसामुळे नुकसानग्रस्त झालेल्या अनेक दुकानदारांना अद्याप नुकसानभरपाई मिळालेली नसल्याचाही मुद्दा त्यांनी उपस्थित केला.

# सेवेचा सुवर्णप्रवास पूर्ण; जाफ्राबाद आगारातील तीन कर्मचाऱ्यांचा गौरव

**दत्ता देशमुख**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या जाफ्राबाद आगारात प्रदीर्घ व कर्तव्यनिष्ठ सेवा बजावून सेवानिवृत्त झालेल्या तीन कर्मचाऱ्यांचा मंगळवारी भावपूर्ण वातावरणात गौरव समारंभ आयोजित करण्यात आला.

यावेळी वाहक सुधाकर नारायण राऊत, स्वच्छक म. साबेर म. जमाल आणि वाहतूक नियंत्रक अशोक सुपडा बारोटे यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह

देऊन गौरव करण्यात आला.



मान्यवरांनी आपल्या मनोगतात तिन्ही कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिकपणा, शिस्तप्रियता, कर्तव्यनिष्ठा आणि प्रवाशांप्रती असलेल्या सेवाभावाचे कौतुक केले. त्यांच्या कार्यामुळे जाफ्राबाद आगाराच्या प्रगतीत मोलाचे योगदान मिळाल्याचे सांगत त्यांची कार्यशैली नव्या कर्मचाऱ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त केले. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी सेवाकाळातील आठवणींना उजाळा देत सहकारी व वरिष्ठांनी दिलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. महामंडळातील सेवाकाळ हा आयुष्यातील अभिमानास्पद प्रवास असल्याच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या. या कार्यक्रमास आगारातील अधिकारी, कर्मचारी, सेवानिवृत्त कर्मचारी, कुटुंबीय तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. समस्त जाफ्राबाद आगार कर्मचारी वृंद यांच्या वतीने आयोजित या समारंभात सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना उत्तम आरोग्य, सुखसमृद्धी आणि दीर्घायुष्याच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

# शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा - डॉ. कृष्णकांत कनवारिया

**जालना - प्रतिनिधी**

शेती उत्पादनात वाढ, उत्पादन खर्चात बचत आणि हवामान बदलाच्या आव्हानांवर प्रभावीपणे मात करण्यासाठी शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवारिया यांनी केले. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरितक्रांतीचे शिल्पकार कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद, जालना यांच्या वतीने स्व. यशवंतराव चव्हाण सभागृहात कृषी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.




कार्यक्रमास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे, प्रकल्प संचालक (आत्मा) अमोल आगवान, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र तुबाकले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी राधाकिशन राऊत, उपमुख्य कार्यकारी अधिकारी लिंबाजी बारगिरे, कृषी उपसंचालक कायंदे, कृषी विज्ञान केंद्र, खरपुडी येथील शास्त्रज्ञ पंडित वासरे तसेच कृषी विज्ञान केंद्र, बदनापूर येथील शास्त्रज्ञ सौ. दिपाली कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

आपल्या मार्गदर्शनात डॉ. कनवारिया यांनी शेतकऱ्यांनी मृदा परीक्षण, सूक्ष्म सिंचन, सुधारित बियाणे, कृषी यांत्रिकीकरण, डिजिटल तंत्रज्ञान आणि हवामानाधारित शेती व्यवस्थापनाचा अवलंब करावा, असे आवाहन केले. जिल्हा परिषद शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी (पान २ वर)

# दुर्गा माता मंदिर परिसरात साकारतोय रोटरी मिडटाऊनचा अत्याधुनिक जॉगिंग ट्रॅक

## रोटरीचा शाश्वत विकासाचा दृष्टिकोन कौतुकास्पद-आयुक्त अंजली शर्मा

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहरातील दुर्गा माता मंदिर परिसरात रोटरी क्लब जालना मिडटाऊनच्यावतीने 'मिडटाऊन जॉगिंग ट्रॅक' साकारण्यात येत असून, बहुउद्देशीय प्रकल्पाचे भूमिपूजन आणि वृक्षारोपण बुधवार दि. १ जुलै रोजी महानगरपालिकेच्या आयुक्त श्रीमती अंजली शर्मा यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून पोलीस प्रशिक्षण विद्यालयाचे प्राचार्य अशोक बनकर हे होते तर व्यासपीठावर क्लबचे अध्यक्ष आलोक नानावटी, सचिव मनमोहन भक्कड यांची उपस्थिती होती. याप्रसंगी बोलताना मनपा आयुक्त अंजली शर्मा म्हणाल्या की, रोटरी क्लब जालना मिडटाऊनने आपल्या कार्यकाळाच्या सुरुवातीलाच इतका मोठा आणि लोकोपयोगी प्रकल्प हाती घेतला, ही अत्यंत आनंदाची बाब आहे. केवळ वृक्षारोपण न करता, या परिसरात जॉगिंग ट्रॅक, मुलांसाठी खेळाची जागा आणि बसण्यासाठी आसन व्यवस्था असा एकात्मिक विकास साधला जात आहे. हे ठिकाण मंदिराच्या जवळ असल्याने येथे नागरिक आधीपासूनच मोठ्या संख्येने येतात, त्यामुळे या ट्रॅकचा समाजाला मोठा फायदा होईल आणि ही या परिसरासाठी एक कायमस्वरूपी मालमत्ता ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच रोटरीच्या या उपक्रमाला महानगरपालिकेकडून सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.



शहरात 'लास्टिंग इम्पॅक्ट' निर्माण करण्याचा मानस : आलोक नानावटी : प्रास्ताविकपर भाषणात क्लबचे अध्यक्ष आलोक नानावटी म्हणाले की, अध्यक्ष म्हणून कार्यकाळाची सुरुवात समाजोपयोगी प्रकल्पाने होत असल्याचा मला अभिमान आहे. रोटरीच्या या वर्षाची संकल्पना 'क्रिएटिंग लास्टिंग इम्पॅक्ट' अशी असून, हा जॉगिंग ट्रॅक त्याच दिशेने टाकलेले एक पाऊल आहे. सर्व सदस्यांच्या सहकार्याने शहराच्या आरोग्यात (पान २ वर)

# जालना समाजकार्य महाविद्यालयात वसंतराव नाईक यांना अभिवादन




**जालना - प्रतिनिधी**

दि. १ जुलै २०२६ रोजी कर्मवीर प्रतिष्ठान संचलित जालना समाजकार्य महाविद्यालयामध्ये सांस्कृतिक विभागाच्या वतीने हरीत क्रांतीचे प्रनेते माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना त्यांच्या जयंतीच्या निमित्ताने अभिवादन करण्यात आले यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उप प्राचार्य डॉ. मधू खोब्रागडे हे उपस्थित होते याप्रसंगी डॉ. मधू खोब्रागडे यांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले यावेळी सांस्कृतिक समन्वयक डॉ. दिपक बुक्तरे,डॉ. सुधीर गायकवाड,डॉ.प्रवीण कणकुटे, डॉ. मीना बोर्डे, डॉ. रेणुका बडवणे,डॉ. बालाजी मुंडे,जगन्नाथ मलवार ,शाम कांबळे, सुमंत माने,विष्णु भोसले,संजय गाडे,विकास राठोड,आदी उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.